रे.के.नं. २१३/२३

नि.क्र. २०/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | विरेंद्र हरिप्रसाद यादव |
| वय | - | ४१ वर्षे |
| व्यवसाय | - | चालक |
| राहणार | - | सोनारी, ता. उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.ए.पोळ यांच्यामार्फत...</u>**

१. दिनांक ०५.०८.२०२३ रोजी मला पोलीसांनी विमल कुमार याच्या किराणा मालाच्या दुकानात सोनारी येथे सकाळच्या वेळी बोलावले होते. विमल याने मला दुकान दाखवले होते. त्या दुकानात चोरीची घटना झाली होती. त्या दुकानाचे शटर तुटलेले होते. दुकानातील काउंटरमधून अंदाजे रक्कम रू. ३,५००/- चोरीस गेले होते. पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. **<u>पंचनाम्यास नि.क्र. २१</u>** देण्यात येत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अमर पाटील यांच्यामार्फत...</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दुकानाच्या चतु:सिमा मला माहिती नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दुकानाचा मालक विमल माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला शेजारून बोलावले व त्यांनी लिहिलेल्या पंचनाम्यावर माझी सही

घेतली.  हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष कोणताही पंचनामा झाला नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण,                                        (ल.मु.सय्यद)

दिनांक – १५.११.२०२४                न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

रे.के.नं. २१३/२३

नि.क्र. २२/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - करण भालचंद्र कडू

वय - २४ वर्षे

व्यवसाय - उद्योग

राहणार - सोनारी, ता. उरण, जि. रायगड

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.ए.पोळ यांच्यामार्फत...**

१. सन २०२३ मध्ये मी स्पर्धा परिक्षेची तयारी करत होतो. मला भ्रमणध्वनी, संगणक, सीसी टीव्ही इ. चे ज्ञान आहे. सोनारी येथील आमच्या मालकीचा गाळा विमल साहू याला भाडेतत्वार दिला होता. दिनांक ०५.०८.२०२३ रोजी दुकानाचे शटर तोडून आतमध्ये घुसून चोरी झाली होती. दुकानातील रोख रक्कम चोरीस गेली होती. आम्ही सदर घटनेची माहिती पोलीसांना दिली. पोलीसांनी आमच्या दुकानातील दोन व ग्रामपंचायत इलेक्ट्रीक पोलचे सीसी टीव्ही तपासले. कडू चाळ येथील दोन सीसी टीव्ही तपासले. पोलीसांनी मला सीसी टीव्ही फुटेज दाखवले व त्याची ठळक क्लीप कट करून मी ते काढून पोलीस स्टेशनला सबमिट केले. ग्रामपंचायतची हार्डडिस्क त्यांच्याकडेच आहे. कडू चाळ व दुकानातील हार्डडिस्क आमच्याकडेच आहे. आता मला मी दिलेले प्रमाणपत्र दाखवण्यात आले. ते तेच असून त्यावर माझी सही आहे. मजकूर खरा व बरोबर आहे. **प्रमाणपत्रास नि.क्र. २३** देण्यात येत आहे. मी पेनड्राईव्ह देताना पोलीसांनी जप्ती पंचनामा केला. आता मला

जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी तसेच पंचांची सही आहे. **पंचनाम्यास नि.क्र. २४** देण्यात येत आहे. ते पेनड्राईव्ह लाल व काळ्या रंगाचा सॅनडिस्क ८ जीबी क्षमतेचा होता. आता मला लाखमोहोर सिलबंद लिफाफ्यातील पेनड्राईव्ह काढून दाखवले. ते तेच असून त्यास **आर्टीकल ए** देण्यात येते. सीसी टीव्ही फुटेजमध्ये चोरीच्या घटनेचे चित्रीकरण आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अमर पाटील यांच्यामार्फत...**

२. प्रमाणपत्र दिल्यानंतर मला समजले की, कलम ६५-बी च्या प्रमाणपत्राचा अर्थ काय आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रमाणपत्र पोलीसांनी तयार करून आणले होते, मी केवळ त्यावर सही केली. पेनड्राईव्ह पोलीसांच्या मालकीचे होते. ते पेनड्राईव्ह रिकामे असल्याबाबतचा पंचनामा माझेसमक्ष करण्यात आला नाही. जप्त पेनड्राईव्ह रिकामेच होते. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही सीसी टीव्ही फुटेज पोलीसांना काढून दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (ल.मु.सय्यद)

दिनांक – १५.११.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण